BHARATI VIDYAPEETH PUNE



भारती विद्यापीठाचे

डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली

# संवाद-भारती

***A Monthly News Letter***

* जुलै - २०१५ *



## सोहळा सुवर्णमहोत्सवाचा...

1964-2014
celebrating
Golden Jubilee
BHARATI VIDYAPEETH
Founder Hon'ble Dr. Patangrao Kadam




Editorial Committee
Dr.D.G.Kanase - President
Dr.Santosh Mane - Editor -In-Cheif
Mr.Amol Vande - Exicutive Editor

An Initiative by Department Of Computer Science.



## प्राचार्यांच्या लेखणीतून

भारती विद्यापीठाच्या ऐतिहासिक वाटचालीमध्ये खारीचा वाटा उचलणारी डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली ही एक शाखा असून भारती विदयापिठाच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात नव्याने सुरु होणाऱ्या **"संवाद भारती "** न्यूजलेटर ची माहिती देताना मला मनापासून विशेष आनंद होत आहे .

मानवाच्या जीवनामध्ये काही आकडे नशीबवान असतात आणि त्यांच्या सोबतीने येणारे क्षण, दिवस आणि वर्षही नशीबवान अशा अर्थाने की ते आकडे दिवस आणि वर्षे दीर्घकाळ स्मरणात राहतात. त्यांच्या आठवणी वर्षानुवर्षे जागविल्या जातात. जसे २६ जानेवारी १९५०, १५ ऑगस्ट १९४७ , हे दिवस आपल्या देशाच्या ऐतिहासिक इतिहासातले संस्मरणीय दिवस यांच्या पद्धतीने भारती विद्यापीठ परिवाराच्या संदर्भातील १० मे १९६४, ८ जानेवारी १९४५ हे दिवस संस्मरणीय आहेत आणि सन २०१३-१४ त्रिदशकीय वाटचाल अत्यंत महत्वाचे आहेत. महाविद्यालयाचा त्रिदशकीय वाटचाली मधले आपण सगळेच नशीबवान आहोत कारण या वाटचालीत बरचं काही **'नेव्हर बिफोर'** असं घडत आहे आणि आपण सगळेच त्यांचे साक्षीदार होत आहोत आणि आपल्या प्रत्येकांच्या आयुष्यात पुढील अनेक वर्षे ही साक्ष आपण जागवणार आहोत. त्यापैकी **सर्वात महत्वाचे म्हणजे महाविद्यालयाचे स्वतःचे मराठी मासिक पत्र "संवाद भारती" सुरु होत आहे की जे संकेत स्थळाच्या माध्यमातून प्रत्येक महिन्याला जगभर प्रदर्शित होणार आहे.**

महाविद्यालयात नेहमीच नाविन्यपूर्ण कल्पनांना वाव दिला जातो ,संवाद भारती च्या माध्यमातून असाच संवाद साधता येईल याचा आनंद आहे सर्व विद्यार्थ्यांनी संवाद भारती च्या माध्यमातून त्यांचे विचार नक्की व्यक्त करावेत या अपेक्षेसह विद्यार्थ्यांच्या लेखन क्षमतेस वाव मिळावा त्यांची सृजनशीलता वाढीस लागावी यासाठी संवाद भारती च्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध झाले असून भारताच्या ऐतिहासिक ,शैक्षणिक,सांस्कृतिक,सामाजिक, औद्योगिक व राजकीय परंपरेला योग्य दिशा देणारे,सकारात्मक विचार असणारे आणि विधायक कृती करणारे ,विद्यार्थी प्रतिनिधी निर्माण करण्यासाठी व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक अभ्यासक्रमपूरक व इतर नाविन्यपूर्ण उपक्रम महाविद्यालयात राबिवले जातात या सर्व उपक्रमाची माहिती संग्रहितरित्या सर्व सर्व विद्यार्थी ,प्राध्यापक व संस्थेतील इतर शाखा तसेच संकेतस्थळाच्या माध्यमातून जगभर पोहचविण्यासाठी "संवाद " साधण्यासाठी भावी काळात **"संवाद भारती"** नक्कीच पथदर्शी ठरेल असा विश्वास वाटतो .



**प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे**

भारती विद्यापीठाचे
# डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली
- NEWS LETTER -

July-2015 • संकेतस्थळाच्या माध्यमातून जगभर सर्वत्र उपलब्ध • संवाद– भारती



Founder : Dr.Patangaro Kadam

“The best way to predict the future is to create it.”

— PETER DRUCKER

## 'भारती विदयापीठाच्या सुवर्ण महोत्सवाची राष्ट्रपतींच्या उपस्थितीत सांगता

पुणे : देशाच्या विकासासाठी नाविन्यपूर्ण आणि उपयुक्त संशोधनाची गरज असून औद्योगिक कंपन्यांनी शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक करून संशोधनाला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.

1964-2014 celebrating 50 Golden Jubilee BHARATI VIDYAPEETH Founder Hon'ble Dr. Patangrao Kadam

जागतिकीकरणातील वास्तव स्वीकारून आपल्या शिक्षण क्षेत्रात बदल करावे लागणार आहेत, असे मत राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी व्यक्त केले.

भारती विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात राष्ट्रपती प्रणव मुखर्जी बोलत होते. राज्यपाल

.... पृष्ठ क्र.४ वर

## तरुणांच्या ऊर्जेचा महासत्तेसाठी वापर हवा - प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे



देशातील तरुणांची वाढती लोकसंख्या एक राष्ट्रीय संपत्ती आहे. या तरुणांच्या ऊजेचा योग्य वापर करून घेत त्यांना दिशा दिल्यास भारत महासत्ता बनण्यास मदत होणार असल्याचे मत प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे यांनी व्यक्त केले. डॉ.पतंगराव कदम महाविद्यायात लोकसंख्या दिन कार्यक्रमात प्राचार्य डॉ.कणसे बोलत होते. यावेळी प्रा.श्रीकृष्ण मोहिते, एम.एच.पाटील, डॉ.बी.डी.पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

पान ३ वरून : **'भारती विदयापीठाच्या सुवर्ण महोत्सवाची राष्ट्रपतींच्या उपस्थितीत सांगता**

सी.विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विद्यापीठाचे संस्थापक व कुलपती डॉ. पतंगराव कदम, कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम आदी यावेळी उपस्थित होते.

देशातील विद्यापीठांमधून तसेच आयआयटी, एनआयटी सारख्या संशोधन संस्थांमधून गेल्या कित्येक वर्षांपासून एकही नोबेल पारितोषिक मिळविणारा संशोधक निर्माण होत नाही, याबाबत खंत व्यक्त करून राष्ट्रपती म्हणाले, देशातील विद्यार्थी परदेशी विद्यापीठात जाऊन नोबेल लॉरीएट होतात. विद्यार्थ्यांमध्ये क्षमता आहे. योग्य मार्गदर्शक शिक्षकही आहेत. आता अधिकाधिक नोबेल लॉरिएट कसे निर्माण होतील या दृष्टीने प्रयत्न करायला हवेत. जर्मनी, अमेरिका, ब्राझील यांसह अनेक विकसनशील देशांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्यांच्या तुलनेत भारतातील विद्यार्थ्यांची संख्या खूप कमी आहे. त्यात वाढ करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे ते म्हणाले.

जागतिक क्रमवारीत पहिल्या २०० विद्यापीठांत देशातील एकही शैक्षणिक संस्था नाही. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर भर देण्याची अपेक्षा राष्ट्रपतींनी व्यक्त केली. भारती विद्यापीठ परिवाराच्या वतीने राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते डॉ. पतंगराव कदम यांना मानपत्र प्रदान करण्यात आले.



## ACTIVITY OF MICRO-ENVIRON CLUB - 2015-16 अॅवार्ड



**20th July, 2015**

- **Inauguration of 2015 activities of “Micro Environ Club”**
- **Organized “Mr. Fresher and Miss Fresher” competition for B.Sc. I Microbiology students, Winners given prizes - Rohit Pawar and Pradnya Wale**

**20th July, 2015**

- **Organized Skit competition for B,Sc. III Microbiology students and eight best acting prizes given.**



## पृष्ठ ३ वरून : तरुणांच्या ऊर्जेचा महासत्तेसाठी वापर हवा- प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे

डॉ.कणसे म्हणाले, जगाची लोकसंख्या सातशे कोटींवर गेली आहे. चीननंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. चीनच्या तुलनेत भारताचे क्षेत्रफळ कमी आहे. जगात भारताचे क्षेत्रफळ दोन टक्के असताना लोकसंख्या सतरा टक्के आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. देशातील तरुणांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन त्यांच्या हाताला काम व योग्य दिशा द्यायला हवी. तरुणांनी समाजातील आपली जबाबदारी ओळखून काम केले तर देश महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही.डॉ.बी.डी.पाटील म्हणाले, भारतात इंडिया आणि भारत असे दोन देश तयार होत आहेत.वाढत्या लोकसंख्यामुळे नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. प्रा.एम्.एच.पाटील यांनी वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाची हानी होत असून त्याचा ऱ्हास थाबवण्यासाठी प्रत्यन करण्याची गरज व्यक्त केली.






प्राचार्य अनिल पाटील प्रसंगी मा.प्राचार्य व इतर मान्यवर



हिंदी दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी मा.प्राचार्य व इतर मान्यवर



लोकमान्य टिळक यांना अभिवादन करताना प्रसंगी मा.प्राचार्य व इतर




“योग आणी आरोग्य” कार्यक्रम प्रसंगी मा.प्राचार्य व इतर

# आंतराष्ट्रीय योग दिन महाविद्यालयात साजरा : क्षणचित्रे









## शरीर, मन सुदृढ असणेसाठी 'योग' आवश्यक : सुशांत खोत

भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय सांगली आयोजित 'योग आणि आरोग्य' व्याख्यान योग तज्ञ श्री. सुशांत खोत यांचे प्रतिपादन.

महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधीनिच्यावातीने लोकमान्य टिळक जयंतीचा योग साधून हा कार्यक्रम महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांसाठी आयोजित करणेत आला. कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या श्री. सुशांत खोत यांनी आपल्या व्याख्यानात योग, योगाचे महत्व, श्वास, श्वासाचे महत्व, योगासन यांचे आपल्या मानवी जीवनात असणारे फार मोठे व महत्वाचे स्थान विषद केले



सूर्यनमस्कार




## Student Reporters:

1.Mr.Desai Shubham B.
2.Pujari Keshav N.
3. Patil Nilam R.
4.Khot Sayali B.
5. Kaware Bhushan B..
6.Hirugade Manoj S.

**|| आवाहन ||**

सर्व शिक्षक व विद्यार्थांना सदर "संवाद -भारती " न्यूज लेटर मध्ये आपले किंवा आपल्या विभागाचे साहित्य ,लेख , प्रकाशित करण्यासाठी dpkm.newsletter@gmail.com या ई-मेल वर साहित्य पाठवावे .

प्रती ________________________
________________________

**• Sanvad-Bharati : Monthly News Letter •**
(For Private Circulation Only)
**Dr.Patangrao Kadam Mahavidyalaya,Sangli**
**dpkm.newsletter@gmail.com**
**dpkmsangli.bharatividyapeeth.edu**